**प्रतिवादी यांचा साक्षीदार क्र. १ यांचा उलट तपास वादी तर्फे विधिज्ञ श्री आर.आर. काझी यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

माझ्या वडीलांचे नाव भगवानराव माधवराव साखरे असे आहे. माझे वडीलांना धरुन सहा भाऊ व तीन बहीणी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सर्व भावामध्ये माझे वडील सर्वांत मोठे आहेत. वडीलांनंतर जनार्धन, जनार्धन नंतर बबन साखरे, बबन साखरे नंतर नामदेव साखरे व त्यानंतर नरसिंग साखरे व त्यानंतर गोविंद साखरे आहेत. सर्वांत मोठी माझे वडीलांची बहीण सुशिला आहे. त्यानंतर गोगल व पुष्पा अशा बहीणी आहेत. माझे आजोबा महादु ज्ञानोबा साखरे हे साधारण १५ वर्षापुर्वी मयत झाले आहेत.

माझी आजी मुक्ताबाई आजोबा वारल्यानंतर मयत झाली होती. ती आजोबा मयत झाल्यानंतर दोन वर्षानी वारली होती. हे म्हणणे खरे नाही की, आई वडील हयात असतांना सर्व भाऊ एकत्र रहात होते. हे म्हणणे खरे आहे की, सर्वात जास्त माझे वडील शिकलेले होते. साक्षीदार स्वत:हून सांगते की, दोन काका देखील शिकलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील शिकलेले असल्यामुळे घरचा सर्व कारभार माझे वडीलांकडे होता. माझे वडीलांना नोकरी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांचा सर्व कांही शेतीवर चालत होते. साक्षीदार स्वत:हून सांगते की, माझे वडील खाजगी शिकवणी घेत होते. त्याबाबतचा मी पुरावा या प्रकरणात दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील खाजगी शिकवणी घेत होते असे मी खोटे सांगत आहे.

प्रश्न- तुमच्या काका, आजोबा, वडील व त्यांच्या बहीणीमध्ये वाटणीचा दस्त झाला होता का.

उ.- मी लहान असल्यामुळे मला त्याबाबत कांही माहीत नाही.

हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकती या एकत्र कुटूंबाच्या मिळकतीतून घेतेल्या एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत.

प्रश्न- दावा मिळकतीपैकी कोण कोणत्या मिळकती एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून घेतल्या हे तुम्हाला माहीत आहे काय.

उ.- माझे आई वडीलांनी त्यांच्या उत्पन्नातून जेवढया मिळकती घेतल्या होत्या त्याबाबत मला माहीती आहे.

मला केवळ वाटणी झाल्याचे माहीत आहे. परंतू त्याबाबत वाटणीचा कागद झाला आहे किंवा नाही याबाबत मला कांही माहीत नाही. मी वाटणीपत्राचा कागद दाव्यात दाखल केला आहे. त्याबाबत फेरफार झाला आहे असे साक्षीदार स्वत:हून सांगत आहे. त्याचा फेर क्र. ३२१ व ३२२ असा आहे. हे मला माहीत नाही की, नोंदणीकृत वाटणीपत्र झाले होते किंवा नाही हे मला माहीत नाही.

मी बाबु नरु साखरे व किशन नरु साखरे यांना ओळखते. ते माझे वडीलांचे चुलत भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी जे फेरफार झाले आहे असे म्हणत आहे ते फेरफार माझे वडीलांचे चुलत भाऊ, माझे काका यांच्यामध्ये फेरफार झालेले आहे. मी फेरफाराच्या व्यतिरिक्त इतर कोणताही वाटणीपत्राचा दस्त पाहीलेला नाही. माझे आजोबा हयात असतांना माझे वडील लातूरहून गावाला आठवडयातून एकदा तरी येत होते. माझे वडील सन २००४ मध्ये वारले आहेत. हे मला माहीत नाही की, माझे वडील हयात असतांना माझे काका व वडील यांच्यामध्ये एकत्र जमीनी घेण्यात येत होते. हे म्हणणे खरे नाही की, लातूर येथील घर क्र. आर-३/८५४ हे सगळया भावानी मिळून माझे वडीलांच्या नावे विकत घेतले होते. हे मी सांगू शकत नाही की, माझे आजोबा जिवंत असतांना वादग्रस्त मिळकती विकत घेण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, वडील हयात असतांना जमीन काका कसत होते. साक्षीदार स्वत:हून सांगते की,माझे वडील गडी ठेवून जमीन कसत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा हयात असतांना माझे वडील व काका यांच्या जानवळ येथे चुली एकत्र होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील शिकलेले होते म्हणून घरचा सर्व कारभार

त्यांच्याकडे देण्यात आला होता.

हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांना कोणतेही कामकाज नव्हते त्यामुळे दावा मिळकती या एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून विकत घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांनी व आजोबानी काका व माझे आत्यांना वाटणी करुन दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी घर क्र. ८४८ मौजे जानवळ येथील घर शिला पवार यांना विकले आहे. हे म्हणणे खरे नाही की, शिला पवार यांना असे समजले होते की, ते घर एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून खरेदी घेतलेले आहे, त्यामुळे ते घर त्यांनी बबन साखरे यांना परत केले होते.

प्रश्न- त्याबाबतची तडजोड आम्ही या प्रकरणात दाखल केले आहे.

उ.- मी माझे वडीलांची मिळकत शिला पवार यांना विकली होती, शिला पवार यांनी नंतर काय केले हा त्यांचा प्रश्न आहे.

हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांच्या बहीणी व भाऊ यांचा हिस्सा डावलण्याकरीता वाटणी झाली आहे असे खोटे कथन करत आहे.

हे म्हणणे खरे आहे की, जनार्धन यांचे वय ७० च्या पुढे व बबबनचे वय ६५ च्या पुढे आहे, त्यामुळे वाटणी झाली आहे किंवा नाही याची माहीती माझे पेक्षा जास्त त्यांना माहीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पेक्षा जास्त त्यांना माहीत आहे. हे मला माहीत नाही की, त्यांनी न्यायालयात काय जबाब दिला आहे त्यामुळे मी हे सांगू शकत नाही की, माझे चुलते यांनी बरोबर जबाब दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे नावे जास्त मिळकती असल्यामुळे मी खोटा जबाब देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.02.16 13:18:33 +0530

( व्ही. एस. वाघमोडे )

दि. १६/०२/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर